महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.**
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ : मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ २६**

# राज्याच्या अखंडित वीजनिर्मितीसाठी रेल्वेने दिले योगदान

**मुंबई, दि. ३० :-** महानिर्मितीच्या वीजनिर्मितीत इंधन कोळशाच्या पुरवठयाअभावी व्यत्यय येऊ नये, यासाठी मध्य रेल्वेने विशेष सहकार्य करुन एक सकारात्मक पायंडा पाडला आहे. नुकताच साऊथ ईस्टर्न व मध्य रेल्वेने २२ जून ते २५ जून, २००९ या कालावधीत भिलाई-विलासपूर मार्गावर मेगाब्लॉक घेतला होता. महानिर्मितीला लागणाऱ्या कोळशापैकी एम.सी.एल चा कोळसा संबलपूर-रायपूर-भिलाई दुर्ग या रेल्वेमार्गाने तर एस.ई.सी.एल. चा कोळसा कोरबा-रायपूर-भिलाई दुर्ग या रेल्वेमार्गाने वॅगनद्वारे नागपूरपर्यंत आणला जात असतो. त्यामुळे महानिर्मितीच्या कोराडी आणि खापरखेडा या वीजनिर्मिती केंद्रातून होणाऱ्या वीजनिर्मितीवर या कालावधीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झालेली होती.

या मेगाब्लॉकसंबंधी मध्य रेल्वेने आगाऊ सूचना देऊन महानिर्मितीस सतर्क केले होते. त्यानुसार महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. मधुकर शेलार, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था १) श्री. चंद्रकांत थोटवे यांनी विशेष कृती योजनेअंतर्गत वरिष्ठ पातळीवर रेल्वे व्यवस्थापनाशी वेळीच संपर्क साधून कोळसा पुरवठा समस्येवर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. मेगाब्लॉक आधी जादा वाघिणीद्वारे कोळसा वाहून आणण्याचे नियोजन करण्यात आले. सदर कोळसा वॅगनमधून उतरविण्याच्या प्रक्रियेत जास्तीत-जास्त गतिमानता राखण्याचा महानिर्मितीने आटोकाट प्रयत्न केला. तसेच वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड या कोळसा पुरवठा कंपनीकडून या काळात अतिरिक्त कोळसा पुरवठा व्हावा, यासाठी प्रयत्न करण्यात आले. या सर्व प्रयत्नांची एकत्रित परिणीती म्हणजे कोराडी व खापरखेडा केंद्रातून होणाऱ्या वीजनिर्मितीत कोळशाअभावी कोणताही व्यत्यय आला नाही.

महानिर्मिती व मध्य रेल्वे आणि सर्व कोळसा पुरवठा कंपनी यांनी या प्रसंगातून सकारात्मक समन्वयाचा निश्चितच प्रत्यय दिला आहे.

---

प्रति,                                                                 दिनांक : ३०.०६.२००९
**माननीय संपादक ,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**